**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरांमध्ये वाढ/ घरगुती सिलेंडरच्या दरात बदल नाही

- राज्यसभेच्या २४ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी अधिसूचना जारी / १८ जूनला मतदान

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस

- आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर

**आणि**

- ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचं काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन

<><><><>

दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई या चार प्रमुख शहरांमध्ये हॉटेल आणि इतर व्यवसायांसाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी सिलेंडरच्या दरांमध्ये ४२ रूपयांपासून ते ५३ रूपये ५० पैश्यापर्यंत वाढ करण्यात आली आहे. तर घरगुती वापरासाठीच्या गॅसच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही.

दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात ४२ रूपयांची वाढ झाली असून आता या गॅसची किंमत ३ हजार ११३ रूपये ५० पैसे, मुंबईत ४३ रूपये ५० पैश्यांनी वाढ झाली असून सिलेंडरची किंमत ३ हजार ६७ रूपये ५० पैसे, कोलकात्तामध्ये ५३ रूपये ५० पैसे रूपयांची वाढ झाली असून गॅसची किंमत ३ हजार २५५ रूपये ५० पैसे तर चेन्नईमध्ये ४२ रूपयांची वाढ होऊन गॅसची किंमत ३ हजार २८३ रुपये झाली आहे. त्याबरोबरच पाच किलोग्रमच्या छोट्या गॅस सिलेंडरच्या दरात ११ रूपये वाढ झाली आहे.

दरम्यान, केंद्र शासनाने आजपासून पेट्रोल, डिझेल आणि एटीएफ म्हणजे विमान इंधनावरचा निर्यात कर कमी केला आहे. पेट्रोलच्या निर्यातीवरील विंडफॉल गेनवरचा कर निम्म्यावर आणून १ रूपया ५० पैसे प्रतिलीटर, तर डिझेल १३ रूपये ५० पैसे प्रतिलीटर आणि एटीएफवरचा कर ९ रूपये ५० पैसे प्रतिलीटर केला आहे.

<><><><><>

भारत आणि ओमान यांच्यातला व्यापक आर्थिक भागीदारी करार आजपासून अमलात आला. या करारामुळे भारतीय वस्तू आणि सेवांना ओमानच्या बाजारात संधी उपलब्ध होईल, तसंच दोन्ही देशातले आर्थिक संबंध दृढ होतील असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी एका वृत्तपत्रात लिहिलेल्या लेखात म्हटलं आहे. या करारामुळे निर्यातीला चालना मिळेल, गुंतवणूक आकर्षित होईल तसंच रोजगाराला चालना मिळेल, त्यामुळे याचा फायदा शेतकरी, सूक्ष्म आणि लघु उद्योग, विद्यार्थी, महिला, कारागीर यांना होणार आहे, असं गोयल यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यसभेच्या २४ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज अधिसूचना जारी करण्यात आली. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून ८ जूनपर्यंत अर्ज भरता येतील. १८ जूनला मतदान होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होईल.

आंध्रप्रदेश, गुजरात आणि कर्नाटकमधल्या प्रत्येकी ४, राजस्थान आणि मध्यप्रदेशातल्या प्रत्येकी ३, झारखंडमधल्या २, आणि मणिपूर, मेघालय, अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम इथल्या प्रत्येकी एका जागेसाठी ही निवडणूक होणार आहे.

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी, तसंच तमिळनाडू आणि ओदिशामधेही प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

माजी प्रधानमंत्री एच. डी. देवेगौडा, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे हे या महिन्यात निवृत्त होत आहेत.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. अर्जांची छाननी २ जूनला होईल तर ४ जूनपर्यंत अर्ज मागे घेता येतील. मतदान आणि मतमोजणी २२ जूनला होणार आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीने आपापले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. महायुतीकडून भाजपा ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार आहे. भाजपाने आज १० उमेदवारांची नावं जाहीर केली.

महाविकास आघाडीचं जागावाटपही ठरलं असून काँग्रेस ८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तीन जागा लढवणार आहे. काँग्रेस नागपूर, यवतमाळ, भंडारा- गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर आणि बीड-लातूर-धाराशिव मतदारसंघातून निवडणूक लढवेल. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि परभणी-हिंगोली या मतदारसंघासाठी उमेदवार दिले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पुणे, ठाणे आणि सांगली-सातारा मतदारसंघातून निवडणूक लढवेल.

**<><><><><>**

गेल्या महिन्यात वस्तू आणि सेवा कर महसुलात ३ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ होऊन तो एक लाख ९४ हजार कोटी रुपयांवर पोहोचला. गेल्या वर्षीच्या मे महिन्यात वस्तू आणि सेवा कराचं संकलन एक लाख ८८ हजार कोटी रुपये झालं होतं.

मे २०२६ मधे समग्र वस्तू आणि सेवा कर संकलन ३७ हजार ३९७ कोटी रुपये तर राज्यांच्या जीएसटीचं संकलन ४५ हजार १४३ कोटी रुपये झालं. एकात्मिक जीएसटी चा महसूल ५१ हजार ९९० कोटी रुपयांवर पोहोचला.

**<><><><><>**

आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यंदा ५६ हजार ८८० विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले असून त्यात १० हजार १०७ विद्यार्थिनी आहेत.

आयआयटी दिल्ली विभागातला शुभम कुमार ३६० पैकी ३३० गुण मिळवून देशात सर्वप्रतम आला आहे. विद्यार्थिनींमधे दिल्ली विभागातली आरोशी देशपांडे पहिली आली आहे. तिला २८० गुण मिळाले असून सर्वसाधारण यादीत ती ७७व्या क्रमांकावर आहे. विद्यार्थ्यांना जेईईएडीव्ही.एसी. इन या संकेतस्थळावर निकाल पाहता येतील.

**<><><><><>**

भावसंगीतात आपल्या मखमली आणि मधाळ स्वरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचं काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन झालं. त्या 89 वर्षांच्या होत्या. सुमन कल्याणपूर यांच्या निधनानं संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीय इतमामात अंतिम संस्कार केले जातील. ऐकूया त्यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा….

*(सुमन कल्याणपूर यांचा जन्म 28 जानेवारी 1937 या दिवशी अविभाजित भारतातल्या ढाका इथं झाला. गायन आणि चित्रकलेची आवड असलेल्या सुमनताईनी पंडित लक्ष्मण राव अमृते, पंडित केशवराव भोळे , उस्ताद खान अब्दुल रहमान खान आणि पंडित यशवंत देव यांच्याकडून शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं. सुमन हेमाडी या नावानं संगीत क्षेत्रात प्रवेश केलेल्या सुमनताई विवाहानंतर सुमन कल्याणपूर या नावानं प्रसिद्ध झाल्या. 1952 मध्ये ऑल इंडिया रेडिओवर गाण्याची संधी त्यांना मिळाली. 'केतकीच्या बनी'सारखं भावगीत, गवळण, विरहगीतं, भावगीतं, भक्तीगीतं, बालगीतं अशा वैविध्यपूर्ण मराठी गाण्यांनी त्यांनी एक काळ गाजवला. भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले, गीता दत्त, शमशाद बेगम या गायिकांच्या तारकामंडळात त्यांनी स्वतः चं स्थान निर्माण केलं. 'अजहून आये बालमा', 'ठहरिये होश मे आ लूँ', 'न तुम हमें जानो' सारखी असंख्य गाणी गाऊन त्यांनी हिन्दी चित्रपट संगीतातही आपला वेगळा ठसा उमटवला.*

*अत्यंत भावपूर्ण आणि मधुर आवाजात त्यांनी मराठी, हिंदीसह विविध भाषांमधील हजारो गाणी अजरामर केली. त्यांच्या आवाजातली सात्त्विकता आणि भाव रसिक मनाला थेट भिडणारे होते.*

*'सुमन सुगंध' हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशित झालं आहे. संगीतातल्या त्यांच्या अमूल्य योगदानासाठी त्यांना, 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं, तर मध्य प्रदेश सरकारनं त्यांना 'लता मंगेशकर' पुरस्कारानं सन्मानित केलं होतं.)*

सुमन कल्याणपूर यांच्या निधनानं संगीत विश्वावर शोककळा पसरली असून अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. सुमन कल्याणपूर यांचा मधुर आवाज आणि आर्त गायनाने सांस्कृतिक जग समृद्ध केलं असं त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. त्यांच्या निधनाने संगीत जगतातील पवित्र देव्हारा रिकामा झाला आहे अशीच सर्वांची भावना असल्याचं राज्यपालांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.भारतीय संगीत क्षेत्रातील दैवी आणि सुरेल 'सुमन' असा स्वर आज शांत झाला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<><><><><>**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने, काल इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल क्रिकेट स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं. या स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ दुसऱ्यांदा विजेता ठरला आहे.

**//<><><><><>//**